अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका, मदतनीस यांचे मानधन जुन्या पध्दतीने आहरित करुन अदा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०१५/प्र.क्र.२७९/का.६
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १७ नोव्हेंबर, २०१७

वाचा :- (१) महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०१५/प्र.क्र.२७९/का.६, दिनांक १४ फेब्रुवारी २०१७
(२) महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०१५/प्र.क्र.२७९/का.६, दिनांक ७ मार्च २०१७
(३) महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०१५/प्र.क्र.२७९/का.६, दिनांक १ जुलै २०१७
(४) आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई यांचे पत्र क्रमांक एबाविसेयो/का-३/लेखा/२०१७/३५९३,दिनांक १० नोव्हेंबर २०१७

शासन निर्णय:-

PFMS प्रणालीव्दारे मानधन सेविकांच्या बँक खात्यात थेट जमा करण्याची कार्यपध्दती प्रायोगिक तत्वावर फेब्रुवारी-२०१७ पासून सुरु करण्याबाबत आयुक्तालयास सूचना देण्यात आल्या होत्या. तथापि काही तांत्रिक अडचणीमुळे त्यांना PFMS प्रणालीत मानधन अदा करणे शक्य झालेले नसल्यामुळे माहे फेब्रुवारी ते मे-२०१७ मधील सेविकांचे मानधन जुन्या पध्दतीने कोषागारातुन आहरीत करुन अदा करण्यास शासनाने वेळोवेळी मान्यता दिलेली आहे.

२. राज्यात अंगणवाडी सेविका/मदतनीस /मिनी अंगणवाडी सेविकांची संख्या २ लाख ७ हजार इतकी असून त्यापैकी आता पर्यंत साधारणत: १,८५,००० अंगणवाडी सेविका/मदतनीस /मिनी अंगणवाडी सेविकांचे मानधन PFMS प्रणालीत अदा करण्यात आलेले आहे. काही सेविकांनी बँक खाती आधार कार्डशी संलग्न न केल्यामुळे त्यांचे माहे जुन-२०१७ पासूनचे मानधन अदा करता आलेले नाही. असे आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी दिनांक १० नोव्हेंबर २०१७ च्या पत्रान्वये कळविले आहे. सेविकांना दरमहा त्यांचे मानधन वेळेत मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे ज्या अंगणवाडी सेविका/मदतनीस /मिनी अंगणवाडी सेविकांचे बँक खाती आधारकार्डशी संलग्न झालेली नाहीत अशा सेविकांचे माहे जुन-२०१७ ते डिसेंबर -२०१७ या कालावधीमधील मानधन जुन्या पध्दतीने आहरीत करुन अदा करण्यास शासन मान्यता देत आहे. सदर कालावधीत आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी विशेष मोहिम राबवुन सेविकांची बँक खाती आधार कार्डशी संलग्न करुन त्यांचे मानधन PFMS प्रणालीत अदा करावे. मात्र १ जानेवारी-२०१८ पासून सेविकांचे मानधन PFMS प्रणालीतच अदा करण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१११७१५०६१४८४३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Lalsing Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2017.11.17 15:53:15 +05'30'

(ला. रा. गुजर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री / राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे स्वीय सहाय्य
५) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
६) सचिव (महिला व बाल कल्याण विभाग), मंत्रालय, मुंबई
७) प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
८) प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा),वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
९) प्राचार्य, अंगणवाडी कार्यकर्ती प्रशिक्षण केंद्र (सर्व)
१०) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे
११) आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजन,नवी मुंबई
१२) सर्व विभागीय आयुक्त
१३) सर्व जिल्हाधिकारी
१४) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१५) सर्व महानगरपालिका आयुक्त, महानगरपालिका
१६) सर्व विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास
१७) सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी
१८) सर्व मुख्य अधिकारी, नगरपालिका,
१९) सर्व मंत्रालयीन विभाग
२०) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखापरिक्षा), महाराष्ट्र मुंबई / नागपूर
२१) महासंचालक, राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन, औरंगाबाद
२२) सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (बाल कल्याण), जिल्हा परिषद
२३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२४) निवासी लेखा परिक्षा अधिकारी मुंबई
२५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२६) महिला व बाल विकास विभागातील सर्व कार्यासने
२७) निवड नस्ती (कार्यासन ६).